# प्रतिभा कॉलेजला राष्ट्रीय पुरस्कार

**पुणे :** क्वीक हिल फाउंडेशनच्या वतीने प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट सायबर सुरक्षेकरिता सायबर शिक्षण हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. तसेच, शिक्षक श्रेणीत महाविद्यालयातील डॉ. हर्षिता वाच्छानी, प्रा. सुप्रिया गायकवाड, प्रा. उज्ज्वला फलक, राष्ट्रपती पुरस्कारविजेता विद्यार्थी दिपू सिंग, सर्वोत्कृष्ट पी. आर. मीडिया डायरेक्टर फर्स्ट विद्यार्थिनी बतुल परवाला, सर्वोत्कृष्ट सायबर वॉरियर्स पहिली धावपटू विद्यार्थिनी श्रावणी सावंत, ओम जगताप यांनाही राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.